|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

उमविनगर जळगाव-425001 ☎: (0257) 2257412

# विद्यापीठ जलतरण तलाव कंत्राटी तत्त्वावर देणेसाठी निविदा

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जलतरण तलाव कंत्राटी तत्त्वावर देणेसाठी कुशल ठेकेदारामार्फत निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेची माहिती, अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदरची निविदा संकेतस्थळावरून डाऊनलोड करुन भरलेली निविदा **दि.०७/०१/२०२०** पर्यंत कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी विद्यापीठाच्या क्रीडा विभाग, कबचौउमवि, जळगाव येथे सायं. ५.०० वाजेपर्यंत जमा करावी. निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अंतिम अधिकार विद्यापीठाचेच राहतील.

ठिकाण : जळगाव
दिनांक : २०/१२/२०१९

**प्रा. भा.व्यं. पवार**
प्र. कुलसचिव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**पोस्ट बॉक्स नं 80, उमविनगर, जळगांव - 425 001**

**टेलिफोन नं -(0257) 2257412/413**

**फॅक्स नं-(0257) 2258406**

**कामाचे नांव**
**उमविनगर परिसरातील**
**जलतरण तलाव करार पध्दतीने 02 वर्ष**
**चालविणेकरीता निविदा.**

**निविदा सादर करण्याची अंतिम तारीख -07/01/2020**

---

**अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर बघावे**

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**इच्छूक नोंदणीकृत संस्था / कंत्राटदार यांचेकडून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव अंतर्गत जलतरण तलाव करार पध्दतीने (०२) दोन वर्षे चालविण्याकरीता व्दिलिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. त्याबाबतच्या अटी व शर्ती.**

१. **लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा.**

योग्य असल्यावर लिफाफा क्र. २ (देकार लिफाफा) उघडण्यात येईल.

**आवश्यक तांत्रिक बाबी.-**

१. अनामत रक्कम रु.५०,०००/-(रुपये अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) वित्त व लेखाधिकारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांचे नावे देण्यात यावा.

२. विहित नमुन्यात अर्ज परिपूर्ण स्वाक्षरीसह सादर करण्यात यावे.

३. तांत्रिक कर्मचारी विशेषत : तज्ञ लाईफ गार्ड / प्रमाणपत्रासह माहिती /तज्ञ प्रशिक्षक / प्रशिक्षक उपलब्धतेची माहिती आवश्यक. (लाईफ गार्ड-६, फिल्टरेशन ऑपरेटर -१, प्रशिक्षक -३ (महिला-१ व पुरुष-२) मॅनेजर-०१ सफाई कामगार-२, सुरक्षा रक्षक -१, एकूण १७ कर्मचारी)

४. आयकर प्रमाणपत्र गतवर्षाचे / पॅन कार्ड सत्यप्रत ( शक्यतो उपलब्ध असल्यास मागील तीन वर्षांचे आयकर (Returns) द्यावेत.

५. चारित्र्य प्रमाणपत्र (वैयक्तीक ) सादर करावे.

६. संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, घटना व पदाधिकारी यादी. (मा. धर्मादाय आयुक्त यांचे संस्था काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र.

७. पुर्व अनुभव किमान एक वर्ष (शासकिय / निमशासकीय ) (फक्त ऑलम्पीक /सेमी ऑलम्पीक साईज चा असावा). जलतरण तलाव चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र आवयश्यक.

८. आवश्यकता असल्यास शासन नियमानुसार लागणाऱ्या दस्ताऐवजांच्या प्रति जसे. Labour Commision Licence, (Swimmers सह/ कर्मचाऱ्यांचा विमा इ.सादर कराव्यात. अथवा निवड झाल्यास २(२)मध्येच स्टॅम्प पेपरवर याबाबतची हमी सादर करावी लागेल.

**उपरोक्त बाबीपैकी ०१ ते ०८ बाबीची पुर्तता केल्यावर लिफाफा क्र. २ चा देकार लिफाफा उघडण्यात येईल.**

**२. लिफाफा क्र. २ देकार रक्कम लिफाफा.**

**आवश्यक बाबी-**

१. विहीत नमुन्यात देकार भरुन (अंकात व अक्षरात नमुद करुन) स्वाक्षरीसह.

**जलतरण तलावाच्या करारातील अटी व शर्ती.**

१. जी संस्था / कंत्राटदार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव अंतर्गत जलतरण तलाव २ (दोन) वर्षाकरीता सुस्थितीत सर्व अटी व शर्तीचे पालन करुन चालविणे व विद्यापीठास किमान प्रतिवर्ष रु. १,७०,०००/- (अक्षरी रूपये एक लाख सत्तर हजार मात्र ) किंवा त्यापेक्षा जास्त देकार रक्कम प्रति वर्ष देईल अशा संस्था / व्यक्तीस कंत्राटदार जलतरण तलाव २ वर्षाकरिता चालविण्यास करार पध्दतीने देण्यात येईल. अर्थात सदरची रक्कम देखील Negotiable राहील. देकार रक्कम प्रति वर्ष देईल अशा संस्था / व्यक्तीस कंत्राटदार जलतरण तलाव २ वर्षाकरिता चालविण्यास करार पध्दतीने देण्यात येईल.

(कंत्राटदारास पुढीलप्रमाणे विद्यार्थी/विद्यार्थीनी/ सभासद यांचेकडून रक्कम जमा होऊ शकते. प्रति महिना रु. २००/- प्रमाणे X ४०० (अंदाजित विद्यार्थी/विद्यार्थीनी ) रु.८०,०००/- तसेच इतर सभासद ६०० रु. प्रमाणे X १५० = ९०,०००/- असे जवळ पास रु.१,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार मात्र ) किंवा त्यापेक्षा जास्त )

➢ कंत्राट मंजूर झाल्यावर देकार रक्कम या पध्दतीने भरावी लागेल.

४० टक्के रक्कम कंत्राट सुरु होताना.

३० टक्के करार झाल्यावर ४ महिन्यानी.

३० टक्के करार झाल्यावर ८ महिन्यानी.

२. अटी व शर्ती मान्य असल्याचा रु. ५००/ च्या स्टँम्प पेपरवर करारनामा व त्यातच देकार रक्कम सादर करावा. ज्या संस्थेचे / कंत्राटदाराचा देकार रक्कम निर्धारित रकमेवर जास्तीत जास्त येईल अशा संस्थेस / कंत्राटदारास जलतरण तलाव २ (दोन) वर्षासाठी चालविण्यास देण्यात येईल.

३. जलतरण तलाव वापराच्या खालील वेळा राहतील. सदर वेळापत्रकामध्ये बदल करण्याचा अधिकार विद्यापीठ नियुक्त समितीचा राहील.

| **बॅच क्रमांक** | | **पोहण्याची वेळ** | |
|---|---|---|---|
| १. | **सकाळी** | ६.०० ते ६.४५ | विद्यार्थी / पुरुष |
| २. | | ७.०० ते ७.४५ | विद्यार्थी / पुरुष |
| ३. | | ८.०० ते ८.४५ | विद्यार्थी / पुरुष |
| ४. | | ९.०० ते ९.४५ | महिला |
| ५. | **दुपारी** | ४.०० ते ४.४५ | महिला |
| ६. | | ५.०० ते ५.४५ | प्रशिक्षणार्थी विद्यार्थी |
| ७. | | ६.०० ते ६.४५ | प्रशिक्षणार्थी विद्यार्थी |
| ८. | | ७.०० ते ८.०० | प्रशिक्षणार्थी विद्यार्थी |
| विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा व प्रशिक्षण (ज्या वेळेस असतील ते लागू राहिल.) | | सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० पर्यंत किंवा समितीने निर्धारित केल्यानुसार | |

**टिप- जलतरण तलाव सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच सोमवारी पूर्ण दिवस पोहण्यास बंद ठेवण्यात येईल तसेच विद्यापीठाच्या आदेशान्वये विविध आंतर महाविद्यालयीन,राज्य, राष्ट्रीय, विभाग, जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा व खास समारंभ असल्यास जलतरण तलाव बंद ठेवण्यात येईल याची आगावू सूचना कंत्राटदारास देण्यात येईल. त्यानुसार कंत्राटदाराने सभासदांना आगावू सूचना द्यावी. प्रत्येक बॅच मधील सभासदांची निर्धारीत संख्या असून, त्यात कुठल्याही परिस्थीतीत वाढ करता येणार नाही. तसे आढळल्यास अतीरीक्त सभासदांचे शुल्क समितीकडे जमा करणे आवश्यक अथवा सुरक्षा ठेव मधून कपात करण्यात येईल.**

**मुख्य जलतरण तलाव -६० सभासदांना परवानगी देण्यात येईल.**

**४. सदस्य प्रकार-**

**मासिक / अर्धवार्षिक**

सदस्यासाठी बॅच निर्धारीत करुन बॅच मधील क्रमांक सदस्यांसाठी आरक्षीत करावा व सदस्य

पुढील महिन्यात गैरहजर राहील्यास दुसऱ्या सभासदास हे आरक्षण द्यावे व सभासदांची अद्यावत

यादी नियमीत जिल्हा क्रीडा कार्यालयात सादर करावी.

**५. जलतरण तलाव शुल्क**

सदस्यांकडून पोहण्यासाठी खालीलप्रमाणे फी (शुल्क) आकारण्यात येईल व यामध्ये कोणत्याही

प्रकारचा फेरबदल कंत्राटदारास करता येणार नाही तर फी मध्ये वाढ करण्याचा अधिकार

विद्यापीठाचा राहील.

**६. जलतरण तलावाची खालील प्रकारे शुल्काची आकारणी कंत्राटदार करेल.**

| | | प्रती मासि शुल्क | त्रैमासिक शुल्क | सहामाही शुल्क | प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५ वर्षाआती खेळाडू/विद्यार्थी (पुरुष महिला ) | २००/- | ५००/- | १०००/- | १००/- |
| २. | इतर सभासद | ६००/- | १७००/- | ३३००/- | |

७. संस्था, संघटना, क्लब, मंडळे, शाळा, शासकीय / निमशासकीय संस्था यांना स्पर्धा व प्रशिक्षण शिबीरांचे आयोजनाकरीता विद्यापीठाने परवानगी दिल्यानुसार व खालील निश्चीत केलेल्या दरानुसार व आकारुन जलतरण तलाव उपलब्ध करुन द्यावा लागेल याकरीता विद्यापीठा मार्फत विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधीत संस्था व कंत्राटदार यांना लागू राहतील.

८. ज्या निविदा धारकास कंत्राट मिळेल अशा यशस्वी निवीदा धारकाला रु. १,००,०००/- विद्यापीठाकडे अनामत रक्कम

म्हणून जमा करावी लागेल.

९. जलतरण तलावाच्या सर्व प्रकारची दुरुस्तीची कामे कंत्राटदाराने आपल्या स्वखर्चाने करुन घेणे बंधनकारक राहिल.

१०. कंत्राटदारकाने विजेचे मासिक देयक नियमीत भरणे बंधनकारक राहील.

११. दररोज पोहणासाठी प्रवेश करणाऱ्या सदस्यांची स्वाक्षरी नोंद करुन ठेवण्यात येईल. तसेच प्रवेश केलेल्या सदस्यांचे ओळखपत्र जमा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१२. जलतरण तलावातील पाणी फिल्टर प्लॅन्ट व्दारे शुध्द ठेवण्यासाठी तसेच त्यात आवश्यक रसायने मिसळण्यासाठी लागणरा खर्च कंत्राटदारास नियमीत करणे अनिवार्य राहिल व याची विद्यापीठाने नियुक्ती केलेल्या समितीमार्फत वेळोवेळी शहानिशा करण्यात येईल.

१४. फिल्टर प्लॅन्ट, सेक्शन स्विपर, विद्युत , प्रकाश व्यवस्था इत्यादींची दुरुस्ती व देखभाल कंत्राटदाराने स्वत: स्वखर्चाने करुन संपूर्ण जलतरण तलाव व परिसर अद्यावत ठेवणे बंधनकारक असेल.

१५. तलावातील तसेच  सभोवतालच्या परिसरातील स्वच्छता ठेवण्याचे काम कंत्राटदार त्यांच्या स्वखर्चाने करावे लागेल.

१६. तलावाची सुरक्षा व व्यवस्था कंत्राटदाराने करावयाची आहे त्यासाठी सुरक्षा रक्षक गणवेशमध्ये नियमीत २४ तास तलावाच्या परिसरात उपलब्ध करावा. प्रसाधनगृहातील स्नानगृहातील स्वच्छतेकरीता कमीत- कमी दोन सफाई कामगार ठेवावे लागतील. तलावाच्या परिसरात चहापाणी व्यवस्था तसेच कोणतही खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवता येणार नाही परंतू प्रथोमपचार साहित्य व इतर आवश्यक साहीत्य ठेवणे बंधनकारक राहील.

१७. तलावाच्या परीसरात उपलब्ध असलेला फिल्टर प्लॅन्ट व इतर अनुषंगीक सर्व सामानाच्या सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

१८. कंत्राटदाराने सदस्यत्व अर्जाचे नमुने व ओळखपत्र उपलब्ध करून दयावेत व त्याकरीता प्रत्येक अर्जाकरीता रूपये ५०/- आकारणी करावी.

१९. एका बॅच मध्ये एकावेळी ६० पेक्षा जास्त सदस्यांना पोहण्याची परवानगी दिली जाणार नाही. याची दक्षता कंत्राटदाराने घेणे बंधनकारक राहील.

२०. जमा झालेली  अनामत रक्कम रू. १,००,०००/- ही जलतरण तलावाच्या बाबतीत किंवा साहित्याला काहि हानी  पोहचल्यास सदर रकमेतून वसूल करण्यास कंत्राटदाराची संमती असेल.

२१. कंत्राटाच्या कराराच्या दिनांकापासून जलतरण तलाव व परिसर कंत्राटाच्या ताब्यात दिलेला असल्याने जलतरण तलावामध्ये किंवा त्या आवारात सदरच्या कालावधीत कोणतीही दुर्घटना अथवा अपघात, मृत्यू झ्ाल्यास  त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटराची असेल व विद्यापीठ किंवा विद्यापीठाचा  त्या घटनेशी काहीही संबंध असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२२. ग्रिष्मकालीन किंवा इतर कोणत्याही कालावधीतील प्रशिक्षण शिबीराकरीता कोणत्याही इतर संस्थेला किंवा व्यक्तीला जलतरण तलाव कंत्राटदाराकडून परस्पर वापरता देता येणार नाही. परंतु समितीचे पूर्वपरवानगीने ही बाब करता येईल परंतु विद्यापीठाचा निर्णय बंधनकारक राहिल. अथवा विद्यापीठा सोबत संयुक्त शिबीराचे आयोजन करावे.

२३. सदस्य शुल्कामध्ये बदल करण्याचा, सवलत देण्याचा किंवा विशिष्ठ समुहाकरिता नविन प्रवर्ग निमार्ण करून शुल्क आकारण्याचा / प्रशिक्षण शुल्क ठरविण्याचा अधिकार विद्यापीठास राहील व कंत्राटदारास ही अट बंधनकारक असेल.

अ) सर्व अर्ज,ओळखपत्र, कुपन नमुना हे विद्यापीठामार्फत प्रमाणित करून देण्यात येतील व त्यानुसार ओळखपत्र सभासद प्रवेशाकरीता कंत्राटदाराने सभासदांना दयावे.

ब) सभासद नोंदणी रजीस्टर ठेवणे व त्यामध्ये दैनंदिन होणाऱ्या प्रवेशाची नोंद अद्यावत ठेवणे हे कंत्राटदारास बंधनकारक असेल. तसेच तक्रार नोंद वही ठेवणे व ती विद्यापीठ कार्यालयास प्रत्येक सात दिवसानंतर  सादर करुन निराकरण करणे आवश्यक राहील.

क) मा. कुलगुरु  यांनी नियुक्त केलेले सदस्य हे आवश्यकतेनुसार केव्हाही जलतरण तलावास भेट देतील. त्यावेळी त्यांना आवश्यक  ती माहिती उपलब्ध करुन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२४. जलतरण तलावामधील पाण्याची आवश्यक ती शुध्दता व गुणवत्ता कायम राखणे बंधनकारक असून, ज्या दिवशी जलतरण तलावातील पाणी पोहोण्यायोग्य नसेल त्यादिवसाचे नोंदणी झालेल्या सभासदांची फी कंत्राटदाराच्या सुरक्षा ठेवीमधून कापण्यात येईल.

२५. विद्यापीठामार्फत आपणास उपलब्ध करून देण्यात साहित्याची चोरी अथवा हानी झाल्यास सदर साहित्याची बाजार भावाप्रमाणे होणारी रक्कम व दुरूस्ती खर्चाची रक्कम  आपणास विद्यापीठाकडे जमा करावी लागेल अथवा सुरक्षा ठेवीमधून सदर रक्कम  कपात करण्यात येईल.

२६. सभासद/ व्यक्तीचे कोणतेही साहित्य चोरी जलतरण तलावाच्या आवारामधून चोरी गेल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची असेल. यासाठी कंत्राटदाराने प्रत्येक सदस्यांना लॉकर सुविधा पुरविणे आवश्यक आहे.
२७. तलावातील तळ ब्रशने नियमीत घासणे व स्वच्छता ठेवणे ही जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.
२८. जलतरण तलावाच्या संदर्भात वारंवार तक्रारी आल्या व त्या योग्य आढळल्यास कंत्राट रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे तोंडी अथवा राखून ठेवण्यात येत आहे. विशेषत: महिला सभासदाबाबत दुर्व्यवहार झ ाल्याचे निदर्शनास येताच अथवा त्यांनी लिखीत तक्रार केल्यास तात्काळ कंत्राट रद्द करण्यात येईल व कंत्राटदारावर नियमान्वये योग्य ती कारवाई करण्यात येईल.
२९. जलतरण तलावामध्ये शालेय स्तरावरील खेळाडूंना सवलत व वेळ देण्याबाबतचा अधिकार विद्यापीठाकडे राहील. जलतरण तलावात विशिष्ट स्पर्धा / विद्यापीठातंर्गत स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्राधान्य ठेवणे बंधनकारक असेल.
३०. जलतरणासाठी आवश्यक असलेल्या गणवेशाशिवाय त्याला पोहण्याची अनुमती दिली जाणार नाही.

३१. विद्यापीठाने काळ्या यादीत टाकलेल्या व्यक्ती अथवा कर्मचाऱ्यास कुठल्याही परीस्थीत जलतरण तलावात प्रवेश व सभासदत्व देता येणार नाही असे आढळल्यास रु.२५,०००/- दंड कंत्राटदाराकडून आकारण्यात येईल.
३२. कंत्राटदाराने सादर केलेल्या तांत्रीक कर्मचारी व व्यवस्थापन कर्मचाऱ्यांच्या यादी नुसारच सदरचे कर्मचारी निर्धारित कालावधीत जलतरण तलावात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सदर कर्मचारी गैरहजर आढळून आल्यास प्रतीदिन प्रतिकर्मचारी रु. १,०००/- दंड आकारण्यात येवून तो कंत्राटदाराकडून अथवा सुरक्षा ठेवीतून वसुल करण्यात येईल.

३३. कंत्राटदारास जलतरण तलाव स्वत:च्या वतीने परस्पर दुसऱ्यास चालविण्यास देता येणार नाही असे केल्यास कंत्राट तात्काळ रद्द करुन विद्यापीठ जलतरण तलाव ताब्यात घेण्यात येईल.

३४. कंत्राटदाराने कंत्राटात नमुद देय रक्कम तीन टप्प्यात देणे बंधनकारक असून सदरचे आगाऊ तारखेचे धनादेश देणे बंधनकारक आहे. सदर धनादेश न वटल्यास नियमान्वये असलेली कारवाई करण्यात येवून तात्काळ कंत्राट रद्द करण्यात येईल.
३५. एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर सदर कंत्राट पुढे मुदतवाढ देण्यात येईल आणि सर्व अटी व शर्तींचा काटेकोरपणे पालन केल्याचे दिसून आले नंतरच पुढील एक वर्ष मुदतवाढ देण्यात येईल.

३६. कंत्राटदार आणि विद्यापीठ यांच्यात काही वादविवाद निर्माण झाल्यास याबाबत वस्तुस्थितीचे अवलोकन करुन विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परीषदेने दिलेला निर्णय अंतिम आणि कंत्राटदारावर बंधनकारक राहिल.याबाबत खटला दाखल करावयाचा झाल्यास मे. न्यायालय जळगाव येथेच दाखल करता येईल.
३७. कंत्राटदाराने निविदा करण्यापूर्वी प्रत्यक्ष जलतरण तलावास भेट देउन पाहणी करावी. निवड झाल्यानंतर पात्र ठेकेदारास रितसर ताबा देण्यात येईल. कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर किंवा विद्यापीठाने ठेका रद्द केल्यावर ताबा सोडतांना तपासणी करून विद्यापीठातर्फे क्रिडा विभाग ताबा घेईल. मिळकतीचे नुकसान संयुक्त तपासणी निदर्शनास आल्यास ते स्वखर्चाने कंत्राटदारास दुरुस्त करून देणे बंधनकारक राहील. अन्यथा प्रशासकीय शुल्कासह दुरुस्तिखर्च अनामत रक्कमेतून / कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

३८. कंत्राट दिल्यानंतर विद्यापीठ खर्चाने कोणतीही सुविधा पुरविण्यात येणार नाही. Swimming /कंत्राटदाराने कर्मचारी यांचा जलतरण तलावात किंवा जवळ काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. किंवा आपसात काही वाद निर्माण झाल्यास ती जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील.
३९. भविष्यात जलतरण तलाव चालविण्यासाठी निगडीत शासनातर्फे काही प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष कर लादले गेल्यास निगडीत कालावधीसाठी सर्व कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील.

४०. विद्यापीठाकडील उपलब्धतेनुसार कंत्राटदारास जलतरणतलावासाठी पाणी देण्याचे सहकार्य करण्यात येईल. अपवादात्मक परीस्थितीत आवश्यकता भासल्यास उपलब्ध स्त्रोतपासून पाणी जलतरण तलावापर्यंत स्वखर्चाने आणण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. विद्यापीठातील पाण्याचे स्त्रोत बंद पडल्यास पाणी देण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहणार नाही. पर्यायी व्यवस्था कंत्राटदारास स्वत: व स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कंत्राटदारास विद्यापीठातर्फे परतावा दिला जाणार नाही.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. या आशयाचा करारनामा मूल्य रुपये १००/- चे मुद्रांक पेपरवर तयार करुन देण्यास माझी कुठलीही हरकत राहणार नाही. तसेच विद्यापीठाचे मा. कुलगुरु यांचा याबाबतचा कोणताही अंतीम निर्णय मला मान्य राहील, याची मी याव्दारे ग्वाही देत आहोत. सदर परीसर हा शैक्षणिक असल्याचे लक्षात घेऊन विद्यापीठाचा नियमांचा कुठलाही भंग होणार नाही याची मी दक्षता घेईल. उपरोक्त विहीत केलेल्या कोणत्याही शर्ती व अटींचा भंग झाल्यास सदर करार नामा कोणत्याही लेखी पूर्व सूचनेशिवाय त्याच वेळी संपूष्टात येऊन जलतरण तलाव एक तर्फी ताब्यात घेण्याचा अधिकार विद्यापीठास राहील. तसेच वेळोवेळी विद्यापीठाने घेतलेले निर्णय कंत्राटदारावर (माझ्यावर) बंधनकारक राहतील.

दिनांक -
ठिकाण -

स्वाक्षरी /-
निवीदा धारकाचे

नाव व पत्ता

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## कबचौउमवि क्रीडा संकुल येथील जलतरण तलाव कंत्राटी पध्दतीने चालविण्याबाबत करावयाचा अर्ज

### प्रपत्र- अ (तांत्रिक लिफाफा)

१. निविदा धारकांचे नांव व पत्ता दूरध्वनी क्रमांकासह ------------------------------------
------------------------------------
------------------------------------

२. अनामत रक्कम रु. ५०,०००/- चा मागणी धनाकर्ष क्रमांक व दिनांक - धनाकर्ष क्रमांक-
दिनांक
बॅंकेचे नांव -

३. निविदा धारकांच्या फर्म/कंपनीचे नांव व पत्ता ------------------------------------
------------------------------------

अ) रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक (प्रत जोडावी) -

४. निविदा धारकांकडे असलेल्या एकूण कर्मचारी संख्या -लाईफगार्ड -
प्रशिक्षक - पुरुष- महिला-
व्यवस्थापक -
सुरक्षा रक्षाक -

५. आयकर प्रमाणपत्र (गतवर्षी सन २०१९-२०२०) /पॅकार्ड क्रमांक (प्रमाणिम सत्यप्रत) -

६. चारित्र्य प्रमापत्र (वैयक्तीक)

७. जलतरण तलाव चालविण्यांचा एक वर्ष अनुभव (पुराव्यासह)(फक्त ऑलम्पीक/सेमी ऑम्पीक साईज चा असावा)

अ) शासकीय ----------------------------------

ब) निमशासकीय ----------------------------------

८. निविदा स्विकृत झाल्यास सोबतच्या प्रपत्रामधील शर्ती व अटी मान्य असून, या अटी व शर्ती लेखी कराराद्वारे करुन देण्यास संमती आहे काय? - होय/नाही

उपरोक्त प्रमाणे मोहरबंद लिफाप्यात मी, भरलेली माहिती सत्य आहे. ही माहिती असत्य आढळून आल्यास, माझी निविदा रद्द होण्यास पात्र राहीन, तसेच मी, निविदा स्विकारण्याबाबत कोणताही आग्रह धरणार नाही.

दिनांक -

ठिकाण - जळगाव

स्वाक्षरी/-

निविदा धारकांचे /फर्मचे नाव

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## क्रीडा संकुल येथील जलतरण तलाव कंत्राटी पध्दतीने चालविण्याबाबत करावयाचा अर्ज

## प्रपत्र- ब (दर लिफाफा)

| अ.क्र. | विवरण | वार्षिक भाडे (वार्षिक देकार रक्कम) |
|---|---|---|
| १. | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे अधिनस्त क्रीडा संकुल येथील जलतरण तलाव कंत्राटी पध्दतीने चालविण्याची वार्षिक देकार रक्कम | रु. /- (अक्षरी ------------------------------------------------------------------------------------------------------------) |

मी/ आम्ही असे जाहीर करतो की, हे दरपत्र सादर करण्यापुर्वी मी / आम्ही दरपत्रामध्ये भरलेले दर ज्यावर आधारलेले आहे, अशा स्थानिक परिस्थीती / मनुष्यबळ / वापर या परिस्थितीचा पुर्ण विचार करुन व काळजीपूर्वक अभ्यास करुन ते समजून घेवून वरील प्रमाणे दर नमूद केलेले आहेत. दिलेले दर मान्य असल्याची मी / आम्ही खात्री दिलेली आहे.